सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/३५१ दिनांक : ०६/१०/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : 'जल्लोष–२०२६' विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि विभागनिहाय महाविद्यालयांच्या वतीने दिनांक २८, २९, ३० सप्टेंबर, आणि ०१, ०३, ०५ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या जिल्हयांमध्ये जल्लोष विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सव संपन्न झाले. या युवक महोत्सवाला विद्यार्थी स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवांमध्ये **प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमाकांने विजयी झालेल्या विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवासाठी निवड झाली आहे.** सदर विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाचे आयोजन **दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२६ रोजी शिक्षण प्रसारक संस्थेचे, संगमनेर नगरपालिका आर्ट्स, डी. जे. मालपाणी वाणिज्य आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर** येथे करण्यात आले आहे.

१. सदर जल्लोष विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवामध्ये **आयोजक महाविद्यालयात आपला संघ आपल्या प्रवास खर्चाने पाठवावा.**
२. जल्लोष विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवांमध्ये **कलाप्रकारनिहाय प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमाकांने विजयी झालेल्या महाविद्यालयाने Annexure-III सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.**
३. प्रस्तुत पत्राचे संपूर्णत: काळजीपूर्वक अवलोकन करणेबाबत संबंधितास आपल्या स्तरावर सूचित करावे.
४. आपल्या महाविद्यालयाच्या संघांचे नेतृत्व सांस्कृतिक समन्वयक/विद्यार्थी कल्याण अधिकारी/प्राध्यापक यांनीच करावे..

'जल्लोष–२०२६' विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवात सहभागी होण्यासाठी सांस्कृतिक समन्वयक/विद्यार्थी कल्याण अधिकारी/संघ व्यवस्थापकांसह विजयी विद्यार्थ्यांना पुढील दर्शविलेल्या आयोजक महाविद्यालयात उपस्थित रहाणेबाबत सूचित करावे. कळावे. ही विनंती.

आयोजक महाविद्यालयात युवक महोत्सवाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे असेल.
१. नाव नोंदणी : सकाळी ०७.३० ते ०८.३० वाजेपर्यंत
२. प्रत्यक्ष स्पर्धेची सुरूवात : सकाळी ०८.०० वाजता.

| आयोजक महाविद्यालयाचे नाव | वार व दिनांक | नाव नोंदणी व संपर्क |
|---|---|---|
| शिक्षण प्रसारक संस्थेचे, संगमनेर नगरपालिका आर्ट्स, डी. जे. मालपाणी वाणिज्य आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर | शुक्रवार, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२६ | डॉ. सुरेश गुडदे ७६२०४०२०५७<br>डॉ. बाळासाहेब पालवे ९३०७०९९१०२ |
| **बक्षीस वितरण सामारंभ : दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायं. ०६.०० वाजता** | | |

*निवड झालेल्या सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील सादरीकरणासाठी शुभेच्छा!*

डॉ. (सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ